# बृहन्मुंबई महानगरपालिका

घ.क.व्य. खाते, जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, प्रभादेवी, मुंबई - 400 013.

**क्र. सहा.अभि.(घ.क.व्य.)/जी.द./२८१४ / दिनांक :- १८.०२.२०२६**

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)

## अशासकीय संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

सदर सूचनेव्दारे जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत अशासकीय संस्थांना कळविण्यात येत आहे की, जी/दक्षिण विभागात "Deep Cleaning" मोहिमे अंतर्गत स्वच्छतेची कामे करण्याकरीता आवश्यकतेनुसार कामगारांचा पुरवठा करण्यासाठी खालिल अटी व शर्तीनुसार ईच्छुक अशासकीय संस्थांनी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई - ४०० ०१३ यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत दि.२३.०२.२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखेनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहितीसाठी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग यांच्याशी कार्यालयीन वेळेत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता) संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :-**

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. उपरोक्त विषयांकीत कामासाठी सोडत प्रक्रियेव्दारे आवश्यक एका संस्थेची नेमणुक करण्यात येईल.
3. आठ तासांच्या पाळीमध्ये संस्थांनी नेमून दिलेल्या ठिकाणी आवश्यकते व सूचनेनुसार कामगारांचा पुरवठा करुन संबंधित कनिष्ठ अवेक्षक यांना दैनंदिन कामाचा अहवाल छायाचित्रासहीत (timestamp app व्दारे) देणे बंधनकारक राहील.
4. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.७९२.३० प्रतिदिन / प्रति कामगार (लेव्ही वगळून) इतके राहील.
5. कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य, अवजारे तसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
6. विषयांकीत कामाच्या अर्ज छाननी शुल्क रु.१,०००/- अधिक १८% वस्तु व सेवा कर (GST) असे एकुण रु.१,१८०/- (ना-परतावा) म.न.पा. च्या नागरी सुविधा केंद्र येथे भरण्यात यावे.
7. अर्ज छाननी शुल्क भरणा चलन दि. १८.०२.२०२६ ते दि.२३.०२.२०२६ रोजी सकाळी ११:०० ते सायं.०५:३० वाजेपर्यंत (साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता) कार्यालयामार्फत देण्यात येईल. सदर वेळेनंतर आलेल्या संस्थांना अर्ज छाननी शुल्क भरणा चलन देण्यात येणार नाही.
8. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.२३.०२.२०२६ रोजी दुपारी ०१:०० वाजेपर्यंतच असून त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
9. विषयांकीत कामाच्या कालावधी दरम्यान नियुक्त संस्थेमुळे जी/दक्षिण विभागाची प्रतिमा मलीन होत असल्यास सदर संस्थेचे नाव पुढील ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्या संदर्भात प्रस्ताविण्यात येईल तसेच सदर संस्थेला नेमून दिलेले काम काढून घेऊन ते काम प्रतिक्षा यादीत निवडण्यात आलेल्या संस्थेस देण्यात येईल.
10. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषायांकीत कामाचा कालावधी तथा प्रस्तावित विसर्जन स्थळाचे ठिकाण व त्याठिकाणी लागणारी मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक तथा स्थगित करण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण**